| MHNS240017452016 | रे . मु. नं. ११८/२०१६<br>राजु छगन सुर्यवंशी व इतर<br>वि.<br>शशिकांत मंदा सुर्यवंशी व इतर |
| --- | --- |

# निशाणी १०२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी त्यांच्याविरुध्द प्रतिदाव्यास झालेला विलंब विनाजबाब/कैफियत चा आदेश रद्दबातल होवुन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

०२. वादी यांचे कथन की, वादींनी प्रतिवादींविरुद्ध घोषणा, निरंतरची ताकीद व अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी प्रस्तुत दावा दाखल केला आहे. प्रतिवादींची कैफियत व प्रतिदावा दि. २२/०९/२०१७ रोजी दाखल झाला असून, त्यावर वादींना जबाब दाखल करण्याची परवानगी देण्यात आली होती. तथापि, पक्षकारांमध्ये समेटाची चर्चा सुरू असल्याने तसेच रोजनाम्यात प्रतिदाव्याच्या जबाबाबाबत स्पष्ट नोंद किंवा विना जबाबाचा आदेश नसल्यामुळे वादींकडून प्रतिदाव्याचा जबाब दाखल राहून गेला. त्यानंतर कोविड-१९ काळातील न्यायालयीन कामकाजातील व्यत्यय, मोजणीची कार्यवाही, मोजणी अहवालास झालेला विलंब व दाव्यातील दुरुस्ती यांमुळेही ही बाब दुर्लक्षित राहिली. वादींकडून कोणतेही जाणूनबुजून दुर्लक्ष झालेले नसून, प्रतिवादी हे वादींचे सख्खे चुलत

भाऊ असल्याने लोकअदालतीतही समेटाचे प्रयत्न झाले होते. आता कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर प्रतिदाव्याचा जबाब दाखल झालेला नसल्याचे निदर्शनास आले आहे. प्रतिवादींचा प्रतिदावा खोटा व निराधार असून, मोजणी अहवालानुसार प्रतिवादींनीच वादीच्या क्षेत्रात अतिक्रमण केल्याचे स्पष्ट झाले आहे. दाव्याची चौकशी अद्याप पूर्ण झालेली नसल्यामुळे, विलंब माफ करून प्रतिदाव्यावर जबाब दाखल करण्याची संधी न दिल्यास वादींना अपरिमीत नुकसान होऊन ते न्यायापासून वंचित राहतील.

**०३.** प्रतिवादी यांनी वादी यांच्या अर्जावर आक्षेप घेतला असून प्रतिवादी यांनी कथन केले की, सदरचा अर्ज योग्य बरोबर व कायदेशिर नाही. अर्जात कायदेशीर कारण नाही. तसेच वादी यांनी प्रतिवादींना ५,०००/- भरपाई म्हणून देण्याचे आदेश व्हावा अथवा सदर अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली नाही.

**०४.** उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचा तपशिलवार युक्तिवाद ऐकला.

**०५.** अभिलेखाची पाहणी केली असता वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादींविरुद्ध घोषणा, निरंतरची ताकीद व अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. याउलट, प्रतिवादी यांनी प्रतिदावा निशाणी २३ हा मालकी हक्क, जाहिर ठराव व निरंतर ताकीदीकरीता दि.२२.०९.२०१७ रोजी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दावा हा सद्यघडीस प्रतिवादी यांच्या पुराव्यावर प्रलंबित आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांचे हक्कसंबंध

गुणदोषारोवर सिध्द करण्याकामी परवानगी देणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने आवश्यक आहे. याशिवाय, वादी यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाच्या कारणापुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र नि.१०३ दाखल केलेले आहे. वादी यांना प्रतिदाव्यास कैफियत दाखल करण्यास सुमारे ८ वर्षे इतका विलंब झाला आहे. परंतू, सदर झालेला विलंब लक्षात घेता वादी यांचेवर दंड रकमेची आकारणी करुन सदर रक्कम ही प्रतिवादीस देणे उचित ठरेल. सदर दंड आकारणीद्वारे वादी यांचेकडून पुढील दाव्याचे सुनावणीस विलंब होणार नाही याची निश्चीती होवू शकेल. सदर प्रकरण हे गुणदोषारोवर न्यायनिर्णीत होण्यास मदत होणार आहे. सदर अर्ज मंजुर केल्यावर उभय पक्षकारांमध्ये विविध प्रकरणे दाखल होणार नाहीत व गुंतागुंत वाढणार नाही. सबब, निम्न आदेश.

## आ दे श

**०१.** वादी यांचा नि.क्र.१०२ वरील अर्ज त्यांनी प्रतिवादीस दंड रक्कम रु. ५,०००/– खर्च पुढील तारखेपर्यंत देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

**०२.** वादी यांनी दंड रक्कम अदा केल्यानंतर त्यांना प्रतिदाव्याची कैफियत अभिलेखावर सादर करण्याची परवानगी देण्यात येते.

MADHUSUDAN DINKAR MAHADIK

Digitally signed by MADHUSUDAN DINKAR MAHADIK
Date: 2026.07.06 17:20:13 +0530

**दिनांक : ०६/०७/२०२६** **(मधुसूदन दिनकर महाडीक)**

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सटाणा.**